


Late. Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sopneth Dist. Parbhani (M.S.)

# राष्ट्रीयरत्न
# भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर
## व्यक्ती आणि कार्य

संपादक

**प्रा. डॉ. घ. ना. पांचाळ**

राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर
व्यक्ती आणि कार्य

संपादक :- प्रा.डॉ.घ.ना.पांचाळ
भ्रमणध्वनी - ९४२१३८१७८५
ई मेल- ghanshyampanchal9@gmail.Com

सर्व हक्क : संपादकाधीन

ISBN :- 978 - 93 - 93786 - 32 - 6

आवृत्ती : प्रथम २०२२

प्रकाशक :
शब्दवेध बुक हाऊस ( प्रकाशन )
पहाडे कॉर्नर, गारखेडा परिसर, औरंगाबाद - ४३१००३
मो.८६३७७८५९६३
ई - मेल : shabadvedhbookhouse@gmail.com

मुखपृष्ठ : सरदार जाधव औरंगाबाद

मुद्रक : रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद

किंमत : ६०० /-

(प्रस्तुत ग्रंथ हा लेखांचा संग्रह आहे.लेखातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची आहेत.)

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College.
Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

# अंतरंग

भाग : १

शुभेच्छा संदेश

१) मा. कुलगुरू डॉ.उद्धव भोसले/२३

२) मा. डी.पी. सावंत/२५

३) मा. सहसंचालक डॉ. विठ्ठल मोरे/२७

४) मा. आ. विक्रम काळे/२९

५) मा. भास्कर चंदनशिव/३१

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

भाग : २

पुढारी/नेते यांच्या शब्दांमधून प्रकटलेले राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर

६) भाई लक्ष्मणराव गोळेगावकर : चळवळीचे अधिष्ठान/ॲड.गणेशराव दुधगावकर/३५

७) लढाऊ भाई.../आ.सुरेश वरपुडकर/३७

८) कृषिवलांचा खरा नेता राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर !/
आ.गुरुनाथ कुरुडे/४१

९) मी राजकारणात आलो ते नानामुळे.../आ.भाई ज्ञानोबा हरी गायकवाड/४४

१०) बळीराजाचा वाटसरूः भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर/आ.संपतराव पवार पाटील/४७

११) राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकरः व्यक्ती आणि कार्य/ॲड. गंगाधर पटने/५०

१२) नाना – एक स्पष्टवक्ता, रांगडा गडी/आ. अब्दुल्लाखान दुर्राणी/५३

१३) गोदाकाठचा सिंह.../आ.डॉ.राहूल पाटील/५५

१४) श्रमजीवी उपेक्षितांचा लोककल्याणकारी जननायकः/भाई धनंजय उद्धवराव पाटील/५८

१५) भाई लक्ष्मणराव गोळेगावकर डाव्या चळवळीचा बुलंद बुरुज/कॉ. राजन क्षिरसागर/६१

१६) माझे जिवलग मित्र : भाई गोळेगावकर/प्रा.ज्ञानोबा मुंढे /७२

१७) माझे राजकीय गुरू : भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर/भाई मोहन गुंड/७४

१८) जयक्रांती भाई.../मोहनराव गळाकाटू/७६

भाग : ३

## साहित्यिकांच्या नजरेतून शब्दबद्ध झालेले भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर


१९) भाई गोळेगावकर.../डॉ. आ.ह. साळुंखे/८३

२०) नानांचा मळा.../प्रा.इंद्रजित भालेराव/८६

२१) चळवळीतील झुंजार नेता.../प्रा.डॉ.प्रल्हाद जी. लुलेकर/९०

२२) अलौकिक व्यक्तिमत्त्व : राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणराव गोळेगावकर साहेब.../डॉ.जयप्रकाश घुमटकर/९४

२३) नाना.... लालबावट्याचे निष्ठावंत पाईक/डॉ. आसाराम लोमटे/९६

२४) चालते-बोलते विद्यापीठ 'नाना'/प्रा. सुरेश जाधव/१०४

२५) जनसेवेचे मानकरी: मा. भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर/प्रा.डॉ.वी.पी.रूद्देवाड/१०७

२६) ''हे शिक्षण कोणासाठी ?'' एक स्तुत्य व अनुकरणीय अभियान/प्रा.डॉ. रामकृष्ण बदने/१०९

२७) गोदातटीचे 'अक्षर' लेणे-भाई लक्ष्मणरावजी गोळेगांवकर/प्रा.विठ्ठल भुसारे/११४

२८) बहुआयामी 'नाना'/प्रा.डॉ. घ.ना. पांचाळ/११८

२९) कर्ममहर्षी नाना...!/प्रा.संजय जाधव/१६८

३०) एक महान विभूती :भाई लक्ष्मणराव गोळेगावकर साहेब/प्राचार्य डॉ.अशोक गवते/१७८

३१) समाजवादाचा रांगडा पाईक : भाई लक्ष्मणराव गोळेगावकर/प्रा.ज्ञानेश्वर डाखोरे/१८०

३२) माझ्या वडिलांचे राजकीय गुरू : राष्ट्रीयरत्न भाई लक्ष्मणराव गोळेगावकर/डॉ.शिवाजी नारायणराव शिंदे/१८३

३३) महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्काराचे मानकरी: भाई लक्ष्मणरावजी गोळेगावकर/डॉ. संगीता जी. आवचार/१८९

३४) गोदातटी ज्ञान-विज्ञानाचा मळा फुलवणारा 'बळीराजा' !/प्रा.डॉ.विठ्ठल खंडोजी जायभाये/१९२

३५) राकट चेहऱ्यावर आनंद शोधू पहाणारा कनवाळू नेता : भाई गोळेगांवकर /जगदीश जोगदंड/१९७

३६) हिमालयाची उंची.../डॉ.संग्राम एम.जोंधळे,/२०१

३७) पत्र/सुरेश जोंधळे/२०३

३८) श्री बळीराजा शिक्षण संस्थेचे आधारवड : भाई लक्ष्मणरावजी मा.गोळेगांवकर/प्राचार्य डॉ.नामदेव खंडगावे/२०४

३९) योगी : भाई लक्ष्मणराव गोळेगावकर/पुरूषोत्तम ना. बारडकर/२१३

४०) एक स्नेही वारकरी.../प्राचार्य डॉ.आबासाहेब कल्याणकर,/२१८


Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist Parbhani (M.S.)

# गोदातटी ज्ञान-विज्ञानाचा मळा फुलवणारा 'बळीराजा' !

Late.Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये,
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय,सोनपेठ,
जि.परभणी (महाराष्ट्र).

---

महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यात, डोंगर-कपारीत आणि विविध नद्यांच्या तटावर अनेक देदीप्यमान मंदिरे, शिल्प आणि विलोभनीय स्थळे असून ती सर्वकाळ माणसांसाठी ऊर्जादायी आणि प्रेरणादायी ठरत आली आहेत ! तिकडे अजिंठ्याच्या सर्वांगसुंदर लेण्या महात्मा बुद्धांचा इतिहास आणि परंपरा सहजपणे नजरेला भव्यतेचे दर्शन देऊन जातात ! दुसरीकडे हिंगोली जिल्यातील दारूका वनामध्ये जगातील एकमेवाद्वितीय सर्वोत्तम असलेले शिल्प म्हणजे औंढा नागनाथ येथील श्री नागनाथाचे आखीव-रेखीव मंदिर कुणाच्याही मनाचा ठाव घेतल्याशिवाय रहात नाही ! तर एकीकडे गोदावरीच्या तीरावर आद्य कवयित्री संत जनाबाई यांच्या जन्माने पावन झालेले तीर्थक्षेत्र गंगाखेड मराठवाड्याच्या संत परंपरेची साक्ष देते. या सर्व परिसराचे वैभव इथल्या नदी-पर्वत वाढवत असतांना संत ज्ञानेश्वरांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी' या अलौकिक ग्रंथामध्ये मध्ये नद्यांचे कार्य विषद करतांना

कीफेडीत पापताप । पोखीत तीरीचे पादप ।
समुद्रा जाय आप । गंगेचें जैसे ।।

या ओवीप्रमाणे इथले जीवनमान जागविण्याचे आणि प्रसंगी महापुराच्या द्वारे लोकांना दिशानिर्देश करण्याचे सामर्थ्य ज्या नद्यांमध्ये आहे त्या क्षमतेचे वर्णन आपल्याला दिसून येते. याच अनुषंगाने मराठवाड्याच्या मातीत काही माणसांनी सामन्यातून असामान्य कार्य करून आपल्या कार्याचा ठसा जनसामान्यांच्या मनावर उमटविला असून तो सर्वकाळ स्मरणात राहणारा आहे.

---

मराठवाड्याची ख्याती तशी केवळ महाराष्ट्रालाच नाही तर अखंड भारताला ज्ञात आहे ! हिंगोली जिल्ह्यातील नरसी (नामदेव)

इथे जन्मलेल्या संत नामदेवांनी नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी।।

या न्यायाने भागवत धर्माची पताका भारतभर फडकवत असतांना वारकरी संप्रदायाचे समताधिष्ठीत तत्त्वज्ञान प्रसारित केले आहे हे विसरून चालणार नाही ! त्याचबरोबर महाराष्ट्रातील अनेक महापुरुषांनी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या बळावर विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवून देशाला दिशादर्शक होण्याचा सन्मान मिळवून दिला आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकोबाराय, छत्रपती शिवाजी महाराज, संत एकनाथ, महात्मा जोतीराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, विनोबा भावे, स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रसंत गाडगेबाबा, राष्ट्रसंत भगवानबाबा आदि महापुरुषांनी आपल्या त्याग आणि कार्याने महाराष्ट्राला भारताच्याच नाही तर जगाच्या सुवर्ण अलंकारित यादीत मानाचे स्थान मिळवून दिले आहे ! ही आपल्या सर्वांसाठीच मोठी गौरवाची बाब आहे ! हे महापुरुष राष्ट्राला नित्य पथदर्शी आहेत !

...Ramesh ...dkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

या सर्व महापुरुषांच्या पाऊलखुणा ओळखून वर्तमानात अनेक समाजधुरिणांनी आपल्या कार्यशैलीने एक वेगळी ओळख निर्माण केली असून ते खऱ्या अर्थाने या महापुरुषांचे वारसदार ठरतात. विविध क्षेत्र जसे की; शिक्षण, कला, क्रीडा, उद्योग इत्यादी क्षेत्रांत आपले भारघोष योगदान दिलेले आढळून येते. भारतीय स्वातंत्र्यानंतर दोन-तीन दशकांनी महाराष्ट्राच्या विविध भागात नव्या विचारांची आणि देशाला अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत सुविधांशिवाय शिक्षण आणि आरोग्य यांचा प्रसार-प्रचार करण्याचे महत्कार्य अनेक समाजधुरिणांनी केलेले आढळून येते. विविध राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींनी ग्रामीण महाराष्ट्रात शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी नेण्याचे कार्य करायला सुरुवात केली. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून समाजातील उपेक्षित-वंचित एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. या दुर्लक्षित जातीतील लोकांना शिक्षण घेण्यासाठी नवे दालन उभारले. दुसरीकडे एक हाडाचे शिक्षण प्रेमी मा.श्री कर्मवीर भाऊराव पाटील यांनी

गावोगाव फिरून, प्रसंगी लोकांना भिक्षा मागून रयत शिक्षण संस्थेची उभारणी केली. या माध्यामातून संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात प्रचार व्हायला सुरुवात झाली. याच काळात औरंगाबादसह विकासापासून कोसो दूर असलेल्या मराठवाड्यात नांदेड, परभणी, जालना, बीड, लातूर या जिल्ह्याच्या परिक्षेत्रात विविध राजकारणी आणि समाजकारणी लोकांनी संस्था नोंदणी करून गोरगरीब लोकांना शालेय आणि माध्यमिक शिक्षण उपलब्ध व्हावे या करीता ग्रामीण भागात शाळा सुरु केल्या.

याच काळात परभणी जिल्ह्यातही शिक्षणाचे वारे हळूहळू वाहू लागले. मुबलक सुपीक जमिनी, भारघोष उत्पन्न, गोदावरी आणि अन्य नद्यांच्या पाण्यामुळे सुजलाम-सुफलाम असलेला परभणी जिल्हा मात्र शिक्षणाच्या बाबतीत अत्यंत मागास म्हणून ओळखला जायचा ! वडिलोपार्जित श्रीमंतीचा कैफ, अरेरावी–पारंपरिक मानसिकतेमुळे परभणी जिल्ह्यात शिक्षणाचा अभाव दिसून येत होता. ही परिस्थिती शिक्षण क्षेत्रात काम करण्यास पोषक होती. याच काळात सगळीकडे शिक्षणाचे वारे वाहू लागले असतांना १९७१–७२ साली महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला. लोकांचे अन्नपाण्याविना भयंकर हाल झाले. तरवट्याचा पाला खावून लोक जिवंत राहिले. अशा खडतर काळात मराठवाड्यात शेतकरी कामगार पक्षाने आपली पाळेमुळे घट्ट केली. परभणी जिल्ह्यात शेतकरी चळवळ मोठ्या प्रमाणात उभी राहिली. याच शेतकरी चळवळीत भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी उडी घेतली आणि शेतकरी–कष्टकरी लोकांसाठी लढायचे ठरवले. परभणी जिल्यातील दुर्गम अशा पालम परिक्षेत्रात काम करत असतांना, राजकारणात ग्रामपंचायत पासून ते पंचायत समिती–जिल्हा परिषदेच्या विविध पदांवर काम करून शेतकरी कामगार पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी केले, परंतु या परिसरातील शिक्षणाची अवस्था पाहून त्यांनी स्वतःच गाव–वस्ती–तांड्यांवर शिक्षणाची गंगा घेऊन जायचे ठरवले. महात्मा ज्योतीराव फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील आदि कृतीशील समाजसुधारकांच्या विचार–कार्याने प्रभावित झालेल्या भाई लक्ष्मणराव गोळेगावकरांनी ईडा–पीडा टळू दे बळीचं राज्य येऊ दे ! हे ब्रीद घेऊन 'बळीराजा शिक्षण संस्थेचे' रोपटे लावले.



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani
Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

पालम परिसरातील सर्वच गाव-शिवार श्री गोळेगावकरांनी विविध आंदोलने आणि निवडणुकांच्या माध्यमातून पायाखालून घातलेला असल्यामुळे कुठे कोणत्या वर्गापर्यंतच्या शिक्षणाची आवश्यकता आहे हे चांगलेच ओळखले होते. त्यानंतर मात्र त्यांनी मागे वळून पहिलेच नाही ! माणसाच्या सर्वांगीण विकासाचे सर्वोत्तम साधन म्हणजे शिक्षण असून, शिक्षण हे वाघिणीचे दूध असून, जो पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही ! हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ब्रीद गोळेगावकरांनी उचलले. शेतकरी कामगार पक्षाच्या मुशीतून घडलेले भाई लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी पालम सारख्या दुर्लक्षित आणि दुर्गम भागात शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी नेतांना अनेक संसार उभे करण्याचेही मोठे कार्य केले. गोर-गरीब, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, गावकुसातील अलुतेदार-बलुतेदारांच्या मुलांच्या हाताला काम नसतांना, त्यांना उच्च शिक्षित करून आपल्याच शाळा-महाविद्यालयांत सेवकापासून ते प्राचार्य पदापर्यंत काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली. एकीकडे संस्थाचालक नेमणूक करतांना लाखो रुपयांची माया जमवत असतात, मात्र श्री गोळेगावकर यांनी आपल्यावरील शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव ओसरू दिला नाही. आपल्या विचारांशी प्रतारणा न करता अनेक घरातील चुली पेटविण्याचे महत्कार्य त्यांच्या बळीराजा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून घडून आले आणि येत आहे.

आज बळीराजा शिक्षण संस्थेअंतर्गत पालम परिसरात हजारो विद्यार्थी अगदी पहिलीपासून ते पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेत आहेत. याच शिक्षण संस्थेत शिक्षण घेऊन पालम परिसरातील अनेक कष्टकरी घरातील मुले वेगवेगळ्या पदांवर काम करत आहेत. आपल्या शिक्षण संस्थेत मा.भाई श्री लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी अनेकांना मोफत नोकरी देऊन त्यांच्या अनेक पिढ्यांचा उद्धार केला आहे. महान विचारांनी झपाटलेले भाई लक्ष्मणराव गोळेगावकर हे आपल्या उतारवयात सुद्धा सतत कार्यमग्न असतात. परभणी जिल्यातील अनेक राजकारणी लोकांनी अनेक पक्ष बदलले, परंतु श्री गोळेगावकर यांनी आपली शेतकरी कामगार पक्षावरील निष्ठा ढळू दिली नाही. आजही ते सातत्याने आपल्या विचारांचा प्रचार-प्रसार करत असून शेतकरी-कष्टकऱ्यांच्या लेकरांना ''शिक बाबा शिक, आता लढायला शिक'' या कविवर्य इंद्रजीत भालेराव सरांच्या कवितेप्रमाणे

Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

लढायला प्रेरित करतात.

आजकाल अशी कर्तव्यकठोर माणसं दुर्मीळ झाली असून, त्यांच्यापासून येणाऱ्या पिढीने आदर्श घेणे आवश्यक आहे. आजघडीला सर्वत्र बाजारीकरण आणि संपत्तीच्या हव्यासापायी अनेक श्रीमंत-राजकारणी-जमीनदार विविध जिवघेण्या आजाराला कवटाळत आपले जीवन दवाखान्याच्या खाटेवर हिरव्या पडद्यामागे आपल्या जीवनाच्या अंतिम घटका मोजत आहेत. अशा लोकांनी श्री गोळेगावकर यांचा आदर्श घेऊन संत तुकांच्या

**याजसाठी केला होता अट्टहास । शेवटचा दिस गोड व्हावा ।।१।।**
**आता निश्चितीनें पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ।।२।।**
**कवतुक वाटे जालिया वेचाचें । नांव मंगळाचे तेणें गुणें ।।३।।**
**तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळी ।।४।।**

या अभंगाचे अवलोकन करावे. असे झाल्यास इथला प्रत्येक श्रीमंत माणूस कोणत्याही आजाराविना शंभर वर्षेजगेल, त्याचबरोबर कुणीही गरीब न राहिल्यामुळे सर्वजण मोठ्या आनंदाने आपले जीवन व्यतित करतील. शेवटी महात्मा ज्योतीराव फुल्यांच्या अखंडातील

**क्षत्रिय भार्या इडापिडा जावो । बळीराज्य येवो आशा करू।।**

हेच महान स्वप्न अनेक देशभक्तांनी पाहिले होते आणि भाई लक्ष्मणराव गोळेगावकर या गोदावरीच्या तटावर ज्ञान-विज्ञानाचा मळा फुलविणाऱ्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ व्यक्तीच्या कार्य आणि धडपडीतून येणारी पिढी नक्कीच हा आदर्श समोर ठेऊन आपले जीवन आनंदी ठेवील या अपेक्षेसह हा शब्दप्रपंच इथे थांबवतो. जय जवान ! जय किसान!

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

संदर्भ सूची:

१. श्री सार्थ ज्ञानेश्वरी, सद्गुरू जोग महाराज प्रत, १९७४
२. श्री तुकाराम बावांच्या अभंगांची गाथा, शासकीय प्रत, १९७३.
३. श्री संत नामदेव गाथा, शासकीय प्रत, १९८०.
४. महात्मा फुले समग्रवाङ्मय, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, १९६९
५. खंडीभर कविता: कविता संग्रह. कवी:डॉ.घ.ना.पांचाळ

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani